

# इंग्रजी, लेख- १

**सुदाम कुंभार, शाळा :** शैलेंद्र एज्युकेशन सोसायटी, दहिसर

## A New Coursebook in English And Format of the Question Paper.

विद्यार्थी मित्रांनो इ. ९ वीमध्ये तुम्ही नवीन अभ्यासक्रमाचे स्वागत केलेले आहे. परंतु शालांत परीक्षेचे महत्त्व लक्षात घेता आणि नवीन अभ्यासक्रम या दोन गोष्टी पाहिल्या तर इ. १० मध्ये तुम्हाला थोडी भीती अथवा 'टेन्शन' असणे स्वाभाविकच आहे.

या सर्व गोष्टींवर मात करण्यासाठीच 'लोकसत्ता यशस्वी भव'च्या माध्यमातून तुम्हाला योग्य आणि अचूक माहिती देण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत.

इंग्रजी विषयाचे आव्हान स्वीकारताना प्रथमच १० वीच्या विद्यार्थ्यांना Oral and Written अशा दोन्ही परीक्षांना सामोरे जायचे आहे. या वर्षी अभ्यासक्रम नवीन आहे म्हणून प्रत्येक विद्यार्थ्याने असा निर्धार केला पाहिजे-

''I must constantly be on the look out for better performance.''

नक्कीच, कोणतीच अडचण येणार नाही.

सर्व विद्यार्थ्यांना एकच सांगायला आवडेल. प्रथम आपल्या पाठ्यपुस्तकाची रचना नीट समजावून घ्या. पाठ्यपुस्तकामध्ये सर्व प्रकारचे उदा. Check your understanding, vocabulary focus, grammar focus, writing focus, communication skill इ. भरपूर exercises आहेत. ते सर्व प्रकार Oral and written test साठी तुम्हाला नक्कीच उपयुक्त ठरतील.

तसेच तुमच्या दैनंदिन अध्ययनामध्ये Listening (श्रवण), Reading (वाचन), Speaking (भाषण), Conversation (संभाषण) इ. कौशल्यांचा भरपूर सराव करा. Oral test या कौशल्यांवरच आधारित आहे.

यासाठी आपण English Reader A Coursebook in English या आपल्या पुस्तकाची रचना सर्वप्रथम समजावून घेऊ या.

प्रत्येक पाठाची सुरुवात **(A) Before you listen** या शीर्षकाने झालेली आहे. - पाठ अभ्यासण्यापूर्वी संबंधित पाठाची पूर्वतयारी. यामध्ये काही ठिकाणी पाठाच्या शीर्षकासंबंधी प्रश्नसुद्धा विचारण्यात आलेले आहेत. (e.g. page- 59) या प्रश्नांकडे दुर्लक्ष करू नका.

**(B) Listen to the text-** यामध्ये पाठाचे वाचन करताना तुम्ही कोणत्या मुद्द्यांकडे विशेष लक्ष द्यावे याबाबत प्रश्न विचारलेले आहेत. हे प्रश्न वाचल्यानंतर संबंधित पाठामध्ये नेमके कोणते विचार मांडलेले आहेत याची कल्पना येते.

प्रत्यक्ष पाठानंतर **Glossary and Notes** यामध्ये प्रत्यक्ष पाठामध्ये संबंधित शब्दाचा कोणता अर्थ अपेक्षित आहे याबाबत माहिती मिळते. येथे सखोल वाचन अपेक्षित आहे.

**(C) Check your understanding -** पाठाच्या आकलनासाठी, स्वत:चे मत देण्याच्या दृष्टीने भरपूर प्रश्न दिलेले आहेत. काही ठिकाणी

1) What, according to you, can we learn from this text?

2) What do you think, is the purpose of this text?

असे प्रश्न अनेक पाठाच्या शेवटी दिलेले आहेत. म्हणजे प्रत्येक विद्यार्थ्याने प्रत्येक पाठानंतर आपण काय शिकलो, संबंधित पाठाचा हेतू काय याबाबत स्वत:चे मत देणे अपेक्षित आहे.

**(D) Vocabulary Focus-** passage मधील 'd' type question ची तयारी करण्यासाठी सर्व exercises चे सखोल वाचन व सराव आवश्यक.

**(E) Grammar Focus-** passage मधील 'c' type question ची तयारी तसेच Grammar स्वतंत्र ५ गुणांच्या तयारीसाठी सखोल वाचन व सराव आवश्यक.

**Writing Focus And Communication Skills-** Writing Skills च्या दृष्टीने दोन्ही घटक खूप महत्त्वाचे आहेत. सर्व 7 Units मध्ये Letter writing, Essay writing, Dialogue writing, Speech writing इ. सर्व प्रकारचे लेखन कौशल्यावर आधारित प्रकार यामध्ये देण्यात आलेले आहेत. जवळजवळ 44 प्रकारचे पत्र, निबंध, संभाषणाचे प्रकार आपल्या पाठ्यपुस्तकामध्ये देण्यात आलेले आहेत. (पुढील लेखात याबाबत सविस्तर माहिती देण्यात येईल.)

आता पाहू या आपली प्रश्नपत्रिका कशी असेल?

## Format of the Question Paper

**Time : 3 Hrs.** **Marks : 80**

**SECTION A :**

Reading skills, Grammar and Vocabulary (prose)

| | | | |
|---|---|---|---|
| **Q. I** | | Two seen passages<br>(15 to 18 lines in length) | |
| **Q. II** | | Two unseen passages<br>(15 to 18 lines in length)<br>(Questions for each text or passage : Q I and II) | |
| | **a.** | two simple factual questions | **- 2 marks** |
| | **b.** | One complex factual question | **- 2 marks** |
| | **c.** | Grammar (2 items) | **- 2 marks** |
| | **d.** | Vocabulary (1 or 2 items) | **- 2 marks** |
| | **e.** | One question of personal response | **- 2 marks** |
| | | | **10 x 4 = 40 marks** |
| **Q. III** | | Grammar (2 or 3 items)<br>Questions testing knowledge of grammatical items not covered in Q. I and II. Emphasis should be given on **dialogue for changing into indirect speech, punctuation, articles, prepositions - 5 marks.** | |

**SECTION : B (Poetry)**

| | | | |
|---|---|---|---|
| **Q. IV** | | Two seen extracts (about 12 lines)<br>For each extract - | |
| | **a.** | One simple factual question | **- 1 mark** |
| | **b.** | One complex factual question | **- 2 marks** |
| | **c.** | One question based on theme/ understanding/ poetic language | **- 2 marks** |
| | | | **5 x 2 = 10 marks** |

**SECTION : C Rapid Reading**

| | | | |
|---|---|---|---|
| **Q. V** | | One seen extract<br>(18 to 20 lines in length) | |
| | **a.** | Two simple factual questions | **- 2 marks** |
| | **b.** | One global understanding question | **- 1 mark** |
| | **c.** | One question of personal response | **- 2 marks** |
| | | | **= 5 marks** |

**SECTION : D (Writing skills)**

| | | | |
|---|---|---|---|
| **Q. VI** | **(1)** | Letter writing<br>(formal **or** informal) | **- 4 marks** |
| | **(2)** | Narrating **or** Describing | **- 4 marks** |
| | | | **Total 8 marks** |
| **Q. VII** | **(1)** | Report writing **or** Dialogue writing | **- 4 marks** |
| | **(2)** | Information Transfer (verbal to non-verbal or vice-versa) **or** preparing a speech | **- 4 marks** |
| | | | **Total 8 marks** |

**SECTION : E (Translation)**

| | | |
|---|---|---|
| **Q. VIII** | 4 sentences of instructions, do's and don'ts, rules, recipes, a passage about 30 words from public notice, weather forecast, news items, descriptions, dialogue, extract from letter etc. | **- 4 marks** |

**Grand Total - 80 marks**

सर्व पालक आणि विद्यार्थ्यांना विनंती इ. १० वी इंग्रजी प्रश्नपत्रिका आणि इतर अधिक माहितीसाठी माहे जुलै २००७ चा शिक्षण संक्रमण पाहा.

विद्यार्थी मित्रांनो, अभ्यासक्रम नवीन आहे, परंतु नवीन गोष्ट उत्सुकतेने पाहिल्यास लवकर समजते. तर चला लागा कामाला.

तुमच्या १० वीच्या तयारीसाठी भावसुमनांच्या सदिच्छांसह...

**उद्याचा विषय : भूगोल**

**संपर्क :** yashasvibhava2007@gmail.com